म. ग्रं. सं. ठाणे
विषय निबंध
सं. क्र. ८

REFBK-0019152
REFBK-0019152

म. ग्रं. सं. ठाणें
निबंध
७
REFBK-0019152

श्री.

# पुणें येथील शके १८४७ चें पहिलें शारदोपासकसंमेलन.

१. आपल्या ह्या नव्या साहित्यसंमेलना चें पुरोहितत्व स्वीकारण्या विषयीं आपण जेव्हां मज जवळ पत्रद्वारा गोष्ट काढिली तेव्हां आपल्या म्हणण्याला रुकार द्यावा कीं न द्यावा एतत्संबंधानें मनांत द्वैधीभाव उत्पन्न झाला. नव्या सभा व नवीं संमेलनें आज भरतात व उद्यां मरतात; किंवा जुन्या संस्थां चीं नवीं संमेलनें कोणा च्या हुकी नें केव्हां तरी लाजे काजे नें कशीं तरी साजरीं केलीं जातात व कांहीं एक काम न करतां प्रकटलीं तशीं अंतर्धान पावतात; किंवा सभासदांत मतभेद होऊन संमेलनें रेंगाळत पडतात; किंवा सभां चे व संमेलनां चे हेतू स्पष्ट व निश्चित नसतात; किंवा हेतू निश्चित असले तथापि ते नेटा नें, व उत्साहा नें व चिकाटी नें पार पाडण्या चें सामर्थ्य व कौशल्य सभासदां च्या आंगीं नसतें. असे नाना खेळ अवलोकनांत येतात. वारंवार असें हि घडतें कीं संमेलनां चे हेतू अगदीं च क्षुल्लक व उपेक्षणीय असतात. या करतां संमेलनां वरचा माझा विश्वास प्रायः सपशेल उडून जात चाललेला आहे. अध्यक्ष होण्या ची हि अलीकडे मला फार भीती वाटूं लागली आहे. घरापुढें पाण्या चा नळ घ्यावया चा झाला तरीहि त्या कृत्याला अलीकडे पुण्यांत अध्यक्ष लागूं लागला आहे. मोरी उकरली, लेजीम खेळली, शिंक मारली, कीं सभा भरवावया ची व अध्यक्ष बोलवावयाचा, असा संप्रदाय बनत चाललेला दिसतो. सभां ना जसा ऊत आलेला आहे तशी च वाचाटतेला हि सहज च उकळी येऊन अध्यक्ष हि सभा भरते कोठें व आ[illegible] तिच्या वर जाऊन बसतों केव्हां इतके उत-

होऊन गेलेले दिसतात. त्या वरून रंग दिसतो कीं अध्यक्षपणा च्या चा पुण्यां त लवकर च धंदा होऊन जाईल. असा प्रकार असल्या मुळें व अध्यक्षपणा च्या धंद्यां त शिरावया चें नसल्या मुळें, आपलें आमंत्रण स्वीकारण्याला मी कांकू च करीत होतों. न जाणों, आपण अध्यक्ष स्वीकारिलें आणि धंदेवाईक अध्यक्षा नें ऐन वेळीं येऊन व आपला हक्क सांगून अध्यक्षा च्या पीठावर स्वयमेव आरोहण केलें, तर नसती भानगत उत्पन्न होऊन संमेलना चें रूपान्तर संहनना मध्यें व्हावयाचें ! जंगलां त जशी सिंहा ची स्वयमेव मृगेन्द्रता, तशीच सभां त धंदेवाईकां ची स्वयमेव अध्यक्षता, असा मनू च झालेला दिसतो. तेव्हां ह्या स्वयमेव Law च्या विरुद्ध आचरण करून order चा बिघाड करण्याला माझें मन धजावें ना. Law आणि order ह्यां च्या नांवा खालीं दुसरे कोणी वाटेल ते अधर्म्य चाळे करो, आपण तरी तसल्या अधर्म्य वृत्ती पासून दूर राहिलें पाहिजे असा विचार मनांत येऊन आपला जोहवकार अंगीकारू नये, असें वाटूं लागलें. हा परमार्थ जसा मनांत वावरत होता, तसा च आपलें आमंत्रण न स्वीकारण्यांत एक स्वार्थ हि मला साधावया चा होता. बैठकी म्हटल्या म्हणजे त्या तीन तीन चार चार तास चालतात. त्यांत एक घटका हि बसावें न बसावें तों आपल्या पुढें चाललेल्या वक्तृत्वा च्या कर्णमधुर दंगलींत दंग होऊन स्वभावतःच चंचल जें मन त्यानें गुंगीतलींत प्रवेश करण्या चा संकल्प केला तर तो हि प्रकार अध्यक्षपदा वर आरूढ होणाऱ्या ला पतित करतो. भर सभेंत आरूढपतित होण्या पेक्षां घरीं च स्वस्थ पडून रहाण्यांत व तेथून आपल्या सर्वां चें अभीष्ट चिंतण्यांत जास्त शहाणपण नाहीं असें कोण म्हणेल ? अध्यक्षत्वा ला भिण्या चें च तिसरें हि एक कारण होतें. सभांत आपण वाटतील ते मोठमोठे ठराव करतों आणि त्यां च्या प्रमाणें आचरण मुळीं च ठेवीत नाहीं. अशा सभां चें अध्यक्षपण करण्यांत वेळ दवडून निराशे नें प्रायश्चित्तार्थ स्वतः च्या थोबाडींत मारून घेण्या चा व मुक्तकंठ रडण्या चा प्रसंग अध्यक्षां वर आलेला आपण सर्वत्र पहातों. अशी आपली आपण च शोभा करून घेण्या पेक्षां त्या भानगडींत च न पडलें तर काय बिघडेल ? या करतां आपलें आमंत्रण न स्वीकारावें असा सूर वाढूं लागला. परंतु आपल

अध्यक्षांनीं जेव्हां बजावून सांगितलें कीं धंदेवाईक अध्यक्ष स्वयमेव मृगेंद्रतेच्या जोरावर जर आसनारूढ होण्याचा प्रयत्न करूं पाहील,तर त्याची कंभक्ती धंदेवाईक तालीमबाजाकडून तेथल्या तेथें यथेष्ट जिरवूं तेव्हां मला आपलें मत बदलण्याचा धीर येऊं लागला. Law आणि order ह्यांचा बोज अश्या रीतीनें पक्का राहील अशी खात्री करून घेतल्या वर व लॉर्ड रालिन्सनादींनीं ज्या बद्दल शंका काढल्या होत्या त्या सेल्फ डिफेन्स ची अशी परभारा व्यवस्था लागल्या वर, अध्यक्षपद स्वीकारण्यास मी कबूल झालों. परंतु पुनः एक शंका आली. आपलें हें शारदामंडळ आहे आणि शारदेची उपासना मी गद्यांत किंवा पद्यांत कधीं च केलेली मला स्मरत नाहीं. माझा सारा जन्म जुनाट रद्दी विसकटण्यांत गेला. वृत्तबद्ध शब्द रचने ला किंवा तालबद्ध संगीत कल्पने ला मीं आजपर्यंत कधीं च शिवलेलों नाहीं. तेव्हां शारदे च्या ठेकेबाज मंडळांत घुसण्या चा, आणि त्यांतल्या त्यांत अध्यक्ष म्हणून घुसण्याचा मला दूरचाहि हक्क पोहोचत नाहीं. ह्या वर माझी अशी समजूत काढिली गेली कीं तुम्हीं गद्यकांत हि मोडत नसला व पद्यकांत हि मोडत नसलां, तथापि माणसांत खचित मोडतां. ह्यांत तर संशय नाहीं च नाहीं हें बोलणें ऐकून मी आश्चर्यानें थक्क होऊन गेलों. आपण माणूस नाहीं, गुलाम आहों, अशी माझी मनदेवता मला स्पष्ट सांगत होती, इतकें च नव्हे तर पिढयानपिढया अशी माझी समजूत होती. पोट बांधून धनी सांगेल तें काम करावें, व अंगावर फेकील तें उष्टें माष्टें चाटावें, इतर स्वजातीय गुलामांवर वांरटें बजवावीं, असे धंदे करण्यांत गढलेला मी गुलाम नव्हें हें मला बिलकुल पटेना. पशूंत देखील गणना करून घेण्यास मी लाजत होतों त्या माझी गणना ह्या शारदामंडळवाल्यां नीं माणसांत करावी ह्या गोष्टी चें मला आश्चर्य वाटलें आणि ह्या बहकलेल्या शारदामंडळवाल्यां ना, त्यां चें अध्यक्षत्व स्वीकारून च,ताळ्या वर आणिलें पाहिजे आणि त्यांचा गुलामपणा त्यां ना पटवून दिला पाहिजे, असा मी प्रत्युत्पन्नमती नें चटकन् बुद्धिनिश्चय केला. निश्चया ची मूर्तिमत्ता अध्यक्षत्वा च्या रूपा नें प्रकट झालेली आपण पहात च आहां.

२ अध्यक्षपद स्वीकारतां ना जश्या शंका वर शंका आल्या, तश्या च

शंका तें स्वीकारल्या वर हि येऊं लागल्या. देशांत एक ग्रंथकारसंमेलन पंचवीस तीस वर्षे वावरत आहे, तें कधींमधीं हालचाल करतां ना हि दृष्टीस पडत; इतकें च नव्हे तर आपसांत भांडण, तंटे, चुगल्या, चहाडया, हि करतां ना आढळतें; म्हणजे तें जिवंत आहे ह्या बाबीला साक्षीपुराव्या चीं जरूर नाहीं. असें असून, नवीन एक साहित्यसंमेलन काढण्याचें कारण काय, अशी शंका अध्यक्षपद स्वीकारल्यावर सहज च आली. तिचें समाधान असें केलें गेलें कीं, जुनें संमेलन दरवर्षी नियमानें भरत नाहीं, काम कांहींएक करीत नाहीं, भरलें च तर कोठें तरी व केव्हां तरी भरतें, सबब नवीन संमेलन बोलाविणें भाग पडत आहे. शिवाय जुनें संमेलन नाचरें आहे. इंदोर, ग्वालेर, बडोदा, नागपूर, मुंबई, पुणें इत्यादि यात्रा करून नाशिकची शेवटली यात्रा आटोपून ते प्रायः निजधामास जाईल असा अंदाज आहे, करतां नवीन संमेलन भरविणें भाग पडत आहे. आणीक असें कीं ह्या यात्रेकरू संमेलना बरोबर यात्रा करीत हिंडण्यास सर्व च शारदाभक्तां जवळ पैसा असतो असें हि नाहीं. मिशनऱ्यां प्रमाणें शारदाभक्तां ना रेलवे फुकट यात्रा करूं देत नाहीं. सरकारी हाफिसरा प्रमाणें सरकारी हप्त्यावर प्रवास करण्याचा हक्क अद्याप शारदाभक्तां ना कौन्सिलां नीं दिलेला नाहीं. पठाण, रोहिले, खिसेकापू व भामटे ह्यांची रेल्वेंतून फुकट प्रवास करण्या ची करामत अद्याप शारदाभक्तां त यावया ची आहे. म्हणून दरवर्षी एके ठिकाणीं म्हणजे पुणें शहरांत शारदाभक्तां चें साहित्यसंमेलन भरविणें अपरिहार्य झालेलें आहे. कोणी ही कबूल करील कीं, ह्या सबबी कांहीं खोटया नाहींत, अक्षरशः खऱ्या आहेत. दूरदूर च्या सफरी करण्या ला निष्कांचन जे शारदाभक्त त्यां ना सांगणें म्हणजे त्यांचा सूड घेण्यासारखें आहे, हा सिद्धान्त सर्वमान्य आहे. कांग्रेसभक्तां प्रमाणें त्यां च्या खाकें त एखाद-दुसरा फंड हि नाहीं कीं त्या च्या जोरा वर त्यां नीं फडकत यात्रा कराव्या. वाटें त बहुमानपुरःसर शारदाभक्तां ना कोणी मेवामिठाई किंवा मेजवान्या हि देत नाहीं. फंड नसो किंवा मिठाई नसो, त्यांची फुकटी मिरवणूक हि कोणी काढीत नाहीं. तेव्हां त्या सरस्वतीपुत्रां नीं एके ठिकाणीं जमण्या चा सोहळा वर्षा च्या वर्षा स पुण्यां तल्या पुण्यां त साजरा करावा, ह्या हून दुसरा

साधा मार्ग नाहीं. मला हें निष्कांचनत्वा चें एक च कारण इतकें समर्पक दिसलें कीं जास्त शंका काढून शारदाभक्तांची आणीक इज्जत घेण्या ची माझी मला च लाज वाटूं लागली आणि सर्व शंका निवारण होऊन संमेलना च्या कार्यक्रमा स बेधडक लागण्यास मी सिद्ध झालों. शंकासमाधान होऊन सिद्ध झाल्या वर एक प्रश्न करणें प्राप्त झालें.

३ **वार्षिकसाहित्यसंमेलनद्वारा** कोणतें निश्चित कार्य पुण्यां तील हें शारदामंडळ साधूं पहाणार, असा प्रश्न केला. त्या ला उत्तर असें मिळालें कीं, मराठी भाषे चा उत्कर्षापकर्ष वर्षोनवर्ष अजमावण्या चा धंदा मंडळ नेटा नें करणार, अपकर्ष होत असल्या स तसा इषारा महाराष्ट्रा ला स्पष्ट देणार आणि उत्कर्ष होत असल्या स तत्प्रीत्यर्थ महाराष्ट्रा चें अभिनंदन करणार. हेतू स्पष्ट आहे. त्यांत संदिग्धपणा बिलकुल नाहीं. मराठी भाषे चा उत्कर्षापकर्ष वर्षोनवर्ष अजमाविण्या चें कार्य ह्या मंडळा च्या हातून अखंड होत रहाणें अत्यन्त इष्ट, आवश्यक व उद्बोधक आहे ह्यांत संशय नाहीं. तसें च, मराठी भाषे चा उत्कर्षापकर्ष अजमाविणें एवढें एक च काम मंडळ करीत रहाणार इतकें च नव्हे, तर मराठी वाङ्मय कोणत्या दिशेनें वाढवावें, त्यांत विविधविषयां वर ग्रंथसंपत्ति कशी निर्माण होईल, हें हि साहित्यकार्य मंडळ आंगा वर घेणार म्हणून हि सांगण्यांत आलें. भाषे चा उत्कर्षापकर्ष पहाणें व तीं त ग्रंथसंपत्ति निर्माण कशी होईल त्या ची दिशा दाखविणें, ह्या दोन कार्यां खेरीज, मंडळ स्वतः ग्रंथनिर्मिति करणार असा हि तिसरा हेतू दर्शविला गेला. शिवाय, देशांतील सर्व ग्रंथकारां चा वार्षिक अन्योन्यपरिचय व विचारविनिमय होऊन हालहवाल कळेल, हा हि अनुषंगिक फायदा आहे च-असे चार मुख्य हेतू एकत्र जमण्या चे निवेदन करण्यांत आले. हेतू स्तुत्य आहेत, अभिनंदनीय आहेत व प्रोत्साहनीय आहेत, हें कोणी हि बिनधोक कबूल करील. भाषा म्हणजे विकारविचारप्रदर्शनाचें जबरदस्त साधन. तिच्या उत्कर्षापकर्षासंबंधा नें विवंचना ऊर्फ मीमांसना करणें देशांतील विचारी व्यक्तीं चें कर्तव्यकर्म नाहीं असें कोण म्हणेल ? विवंचना अवश्य झाली पाहिजे. इतकें च काय, तर ती होण्याला क्षणाचा हि विलंब लावणें म्हणजे समाजा चें न भूतं न भविष्यति असें नुकसान

करणें आहे. करतां, ह्या विंवचने ला ऊर्फ मीमांसे ला ह्या स्थलीं व ह्या प्रसंगीं प्रास्ताविक प्रारंभ केला असतां प्रसंगौचित्या चें उपबृंहण च होईल हें आपण निःसंशय कबूल कराल.

४ मीमांसेला प्रारंभ करतांना, पहिलें भय मना पुढें उभें रहातें तें असें कीं जिचा उत्कर्षापकर्ष आपण अजमावूं पहाणार, जिच्यांत ग्रंथ-संपत्ति ऊर्फ विचारसंपत्ति आपण निर्मिणार किंवा निर्मिण्या चीं दिशा दाखविणार, ती ही आपली मराठी भाषा आपले उदात्त हेतू सहन कर-ण्याला व सफलतेस आणण्याला सध्यां लायक आहे कीं लायक नाहीं ? उदात्त हेतू जिच्या द्वारा तडीस न्यावया चे ती ही आपली मराठी भाषा मरण्या च्या पंथास तर लागली नाहीं ? आणि मरण्या च्या पंथास जर लागली असेल तर त्या मढ्याला सजवीत बसण्यांत कोणता शहाणपणा आहे ? मेल्या मढ्याला गाडून टाकून ताबडतोब मोकळें होणें व नवीन एखाद्या देहाचा अंगीकार करून संसाराला नव्या हुरुपानें लागणें जास्त फलप्रद नाहीं काय ?

५ भय ज्या मानानें उद्वेगजनक आहे त्या च मानानें शोधनीय आहे. मराठी भाषा निखालस मरून जाऊन तिचें अगदीं मढें बनून गेलें आहे किंवा तिच्यांत अद्याप धुगधुगी उरली आहे किंवा तिच्या प्राणाला धक्का लागला नसून तिला फक्त मूर्च्छा आली आहे किंवा तिला कांहीं एक म्हणण्यासारखें दुखणें लागलें नसून ती अन्नाभावामुळें फक्त कृश झाली आहे किंवा तिला मर्मस्थानीं जखमा लागून ती क्षया च्या पंथास लागली आहे, ह्या बहुपक्ष भयाची मीमांसा केली पाहिजे. आपण कोट दोन कोट लोक मराठी भाषा साक्षात् बोलत आहोंत, तेव्हां मराठी भाषा अगदीं मरून जाऊन तिचें अद्याप मढें बनलें नाहीं हें उघड आहे. कांहीं थोडीं सबल दुर्बल वर्तमानपत्रें, लेचींपेचीं गद्यपद्य पुस्तकें, गृह्य व ग्राम्य व्यवहार ह्यांच्यांत मराठी भाषे चा उपयोग अद्याप आपण करीत आहोंत, त्यावरून दिसतें कीं मराठी भाषा अद्याप मेली नसून तिच्यांत कांहीं धुगधुगी उरली आहे. परंतु गृह, ग्राम, दुर्बल वर्तमानपत्रें व दुर्बलतर पुस्तकें सोडलीं म्हणजे समाजा च्या व्यवहारा चे जे बाकी चे प्रांत, त्यांत मराठी भाषे चीं झाडून

सारीं अंगें थंडगार पडून गेलेलीं आहेत. देशांतील सर्वांतली अत्यन्त मोठी व महत्वाची संस्था म्हणजे राज्यसंस्था. तिचा सर्व महत्वा चा व्यवहार परकीय भाषेंत चालतो. म्हणजे राजकीय, आर्थिक, औद्योगिक, शैक्षणिक, दिवाणी, मुलकी, लष्करी, नाविक, तारायांत्रिक, प्रावासिक, स्थापत्यिक वगैरे जे जे अगणित व्यवहार सरकार करतें ते ते इंग्रजी भाषाद्वारा चालतात. तेथें आपल्या मराठी ची ओळख हि राहिली नाहीं. बाकीं राहिलेले जे गृह्य, ग्राम्य, वर्तमानपत्रीय व ग्रांथिक व्यवहार त्यांच्यांत तेवढा मराठीचा उपयोग आपण करतों. त्यांतहि शिकलेले म्हणून ज्यांना म्हणतात ते प्रत्येक दहा शब्दांत पांच चार इंग्रजी शब्द ढकलून देतात. हौसेनें ढकलून देतात असें नव्हे तर इंग्रजी भाषा रोम-रंध्रांत बालपणा पासून भिनून गेल्या मुळें. शिकलेले लोक मनांत विचा-रा चा संकल्प प्रथम इंग्रजी भाषाद्वारा करतात व नंतर त्या इंग्रजी चें भाषांतर इंग्रजीमराठीमिश्र अशा घेडगुजरी अपभ्रंशाच्या द्वारा तोंडांतून सहज उच्चारितात. शिक्षितांच्या संसर्गानें अशिक्षितांच्या हि तोंडीं इंग्रजी शब्द वसत चालले आहेत. एणें प्रमाणें मराठी ची तोंडदाबणी इतकी बेसुमार होत चालली आहे कीं तिची डांबणूक अशी च आणीक पांच पंचवीस वर्षें होत गेल्यास, लवकर च सर्व महाराष्ट्र इंग्रजी भाषा, शुद्ध किंवा अपभ्रष्ट अशी, हांगकांग मधील पीज्यन इंग्लिश प्रमाणें, बोलूं लागेल असा निश्चित अंदाज दिसतो.*

---

* इंग्रजीचा पगडा देशांतील तरुणां वर किती फाजील बसला आहे तें नुक-त्या च माझ्या हातीं पडलेल्या एका आमंत्रणपत्रिके वरून किंचित् ताडतां येतें. आमंत्रण पत्रिका अशी:—

नंबर ८१ Complimentary

" निर्वाहः प्रतिपन्नवस्तुषु "

नूतन मराठी विद्यालय हायस्कूल वार्षिक संमेलन

गुरुवार तारीख २३ एप्रिल १९२५

नांव व्ही. के. राजवाडे

१। रुपया

६ परकीय सरकारच्या परकीय भाषेचा व्याप सर्व व्यवहारांत पसरतो व त्या व्यवहारांत मराठीला गंचाडी मिळते

---

R. L. Oturkar, अध्यक्ष
फोटो जेवण कॉफी नाटक
कार्यक्रम सकाळीं
ईशस्तवन, कॉफी, फोटो, खेळ, जेवण
दुपारीं, गायनवादनचढाओढी व वक्तृत्वाचे सामने
उपदेश इत्यादि अल्पाहार
रात्रौ, नाटक व किरकोळ प्रवेश

Book–Post
रा. व्ही. के. राजवाडे एम्, ए, एल्एल्, बी, पुणें
Superintendent, Nutan Marathi Vidyalaye,
Poona City.
Poona City, 23 April 25; 2–30 P. M.
Poona City, Delivery, 23 April 25; 3–30 P. M.

पत्रिकेत एकंदर ८७ शब्द आहेत. पैकीं इंग्रजी ५२ आहेत. लेखकानें आपली सही इंग्रजींत केली असून माझ्या नांवा चीं आद्याक्षरें इंग्रजींत लिहिलीं आहेत. नांवा चीं आद्याक्षरें इंग्रजी मातृकांनीं लिहिण्याचीं संवय थोडेंबहुत इंग्रजी रटफ करणारे आचारी, पाणके, नंबरटेकर, कारकून, ग्रयाजुएट, बेपारी, ह्यांच्यांत फार रूढ झाली असून, ती संवय उच्च शिक्षण मिळाल्या चें निदर्शक समजतात. कित्येक लोक आडनांवा नंतर आपल्या नांवाचीं आद्याक्षरें लिहून, आडनांवा च्या आधीं आद्याक्षरें लिहिणारां च्या हून आपण जास्त विद्वान् झालों आहोंत असें दर्शवितात. वरील पत्रिकेंत शेंकडा ५८ शब्द इंग्रजी आहेत, सबंद पत्रिका इंग्रजींत लिहिणाऱ्या इसमा पेक्षां ही इंग्रजीमराठीमिश्र आमंत्रणपत्रिका लिहिणारा मुलगा विद्वत्ते नें बराच खालच्या दर्जाचा समजला जाईल. रानडे, टिळक, चिपळूणकर, इत्यादि स्वभाषाभिमानी विद्वान् आपला खासगी हि पत्रव्यवहार इंग्रजींत करीत; अशांचें अनुकरण नंबरटेकर, कारकून, पदवीधर, पाणक्ये इत्यादींच्या हातून न कळत हि झाल्यास त्यांत वावगें असें कांहीं च नाहीं.

ह्यांत इतकें विपरीत असें कांहीं च नाहीं. सार्वजनिक सभा, डेक्कन सभा, इत्यादि लोकनिर्मित संस्थांतून हि देशी भाषांना एकीकडे सारून इंग्रजींत सर्व व्यवहार करावा लागतो, कारण ह्या संस्थांच्या द्वारा परकीय सरकारशीं बोलणें चालवावयाचें असतें. ह्यांत हि एका दृष्टीनें विपरीत असें विशेष नाहीं. खासगी शाळा व कॉलेजें ह्यांचा हि व्यवहार इंग्रजींतून व्हावा लागतो, कारण ह्यांतून निघणाऱ्या विद्यार्थ्यांना पुढें सरकारी नोकऱ्या धरावयाच्या असतात. ह्यांत हि विपरीत असें कांहीं च नाहीं. रहातां राहिली भांडारकर इंस्टिटयूट सारखी पुराणेतिहासादिशोधक अशी एखादी दुसरी खासगी संस्था. हिचें हि सर्व काम इंग्रजींतून चालतें. कारण युरोपीयन पुराणेतिहासकांशीं संबंध रहाण्यास इंग्रजी शिवाय मार्ग नाहीं व आपल्या इकडील झाडून साऱ्या संशोधकांना इंग्रजी जितकी आंगवळणीं पडलेली असते तितकी स्वभाषा जी मराठी ती नसते. तात्पर्य, खासगी संस्थांचा हि सर्व व्यवहार परभाषाद्वारा करण्याची आपत्ति जबरदस्तपणें अपरिहार्य होते. कांग्रेस वगैरे सार्वभारतीय ज्या संस्था आहेत त्यांत हि इंग्रजीचा च आश्रय करणें भाग पडतें. कारण बंगाल, पंजाब, कर्नाटक, ब्रह्मदेश इत्यादि भारतवर्षांतील निरनिराळ्या देशांतील लोकांना एकाची देशी भाषा दुसऱ्याला कळत नाहीं, परंतु परकीय इंग्रजी कळते. तात्पर्य, लहानमोठया सर्व खासगी संस्थांतून हि देशी भाषांना काट मिळाला आहे. मिळून देशांतील सर्व सरकारी व सर्व खासगी संस्थांचा व्यवहार इंग्रजीच्या द्वारा होतो, मराठीला कोणी पुसत नाहीं. हा प्रकार असा च पुढें आणीक एक दोन पिढया चालल्यास, महाराष्ट्राची व सर्व भरतखंडाची खासगी व सार्वजनिक भाषा इंग्रजी सहज च होईल आणि मराठी मरून जाईल असा निश्चित अंदाज दिसतो.

७ संस्थांतून, सरकारी व खासगी अश्या सर्व संस्थांतून, मराठी भाषा पार मरून गेलेली आहे, हें वरील हकीकती वरून स्पष्ट होतें. मराठीचे वाली जे महाराष्ट्रांतील ग्रंथकार त्यांच्या व्यवहारांत मराठी भाषा कितपत जिवंत राहिली आहे तें आतां पाहूं. गेल्या शंभर वर्षांतले महाराष्ट्रांतील नांव घेण्यासारखे जाणते किंवा विद्वान ग्रंथकार घेतों

व ते कोणत्या भाषेंत विकारविचारप्रदर्शन करीत आलेले आहेत त्याचा तक्ता देतों:—

| | नांव | धंदा | पत्रव्यवहार | ग्रंथलेखन | |
|---|---|---|---|---|---|
| | | इंग्रजी मराठी | इंग्रजी मराठी | इंग्रजी मराठी | |
| १ | सदाशिव काशिनाथ छत्रे (बाळमित्रकार) | इंग्रजी | इंग्रजी | मराठी निबंध | मराठी ग्रंथ |
| २ | बाळशास्त्री जांभेकर | इंग्रजी | इंग्रजी | इंग्रजी | शालेय चोपडीं मराठींत |
| ३ | गोपाळराव हरि देशमुख | इंग्रजी | इंग्रजी | भरींव ग्रंथलेखन मराठींत किंवा इंग्रजीत करण्याइतकी विद्वत्ता नव्हती | ग्रंथलेखन मराठी |
| ४ | विठोब्बा अण्णा दफ्तरदार | मराठी | मराठी | | संस्कृत व मराठी काव्य-ग्रंथ |
| ५ | भाऊ दाजी लाड | इंग्रजी | इंग्रजी | निबंध | इंग्रजी |
| ६ | विश्वनाथ नारायण मंडलिक | इंग्रजी | इं० | निबंध ग्रंथ इंग्रजी | कांहीं त्रोटक लेख वगैरे मराठी |
| ७ | परशुराम तात्या गोडबोले | मराठी | मराठी | | सर्व भाषांतरें मराठी |
| ८ | कृष्णशास्त्री राजवाडे | मराठी | मराठी | | सर्व भाषांतरें मराठी |
| ९ | रघुनाथशास्त्री गोडबोले | मराठी | मराठी | | सर्व कोश व ग्रंथ मराठी |
| १० | गणेशशास्त्री लेले | मराठी | मराठी | | सर्व भाषांतरित कविता मराठी |
| ११ | कृष्णशास्त्री चिपळोणकर | इंग्रजी | इंग्रजी मराठी | | सामान्याहून बरें असे इंग्रजी म-राठी लेख, भाषा-न्तरें, कविता |

| | | | |
|---|---|---|---|
| १२ केरो लक्ष्मण छत्रे | इंग्रजी | इंग्रजी मराठी | इंग्रजी मराठी |
| १३ दादोबा पांडुरंग तर्खडकर | इंग्रजी | इंग्रजी | इंग्रजी ग्रंथ व मराठी व्याकरण वगैरे |
| १४ महादेव गोविंद रानडे | इंग्रजी | इंग्रजी क्वचित्; मराठी | निबंध ग्रंथ व्याख्यानें इंग्रजी कांहीं कीर्तनें व्याख्यानें मराठी |
| १५ महादेव मोरेश्वर कुंटे | इंग्रजी | इंग्रजी | बरेच ग्रंथ, निबंध, व्याख्यानें मासिक पुस्तक, कविता इंग्रजी, कांहीं व्याख्यानें भाषांतरें, कविता मराठी |
| १६ अण्णा मोरेश्वर कुंटे | इंग्रजी | इंग्रजी | कांहीं ग्रंथ इंग्रजींत कांहीं मराठी |
| १७ शंकर पांडुरंग पंडित | इंग्रजी | इंग्रजी | बहुतेक सर्व ग्रंथ इंग्रजी, ग्रंथसंपादन मराठी व कांहीं इंग्रजी– मराठी |
| १८ रामकृष्ण गोपाळ भांडारकर | इंग्रजी | इंग्रजी | सर्व ग्रंथ व निबंध इंग्रजी; कांहीं धर्मपर कीर्तनें व व्याख्यानें मराठी |
| १९ विष्णुबोवा ब्रह्मचारी | स्वतंत्र | मराठी | वरच्या दर्ज्याचें सर्व लिखाण मराठी |
| २० काशीनाथ त्र्यंबक तेलंग | इंग्रजी | इंग्रजी | बरेच ग्रंथ, शहाणा ने- |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | टिप्पणी, निबंध इंग्रजी | थन व कांहीं व्याख्यानें मराठी |
| २१ | विष्णु मोरेश्वर महाजनी | इंग्रजी | इं० व म० | | बहुतेक सर्व लिखाण मराठी |
| २२ | विष्णुशास्त्री चिपळोणकर | इं० व स्वतंत्र | इंग्रजी | काहीं शालेय व वर्तमानपत्री लिखाण इंग्रजी | सर्व ग्रंथ मराठी |
| २३ | श्रीधर गणेश जिन्सीवाले | इं० | इं० | एखाददुसरें व्याख्यान इंग्रजी | बाकी सर्व व्याख्यानें मराठी |
| २४ | शंकर मोरो रानडे | गायकवाडी इं० | | | सर्व ग्रंथ मराठी. |
| २५ | काशीनाथ नारायण साने | इं० | इं० व म० | | सर्व लिखाण मराठी |
| २६ | बाळकृष्ण आत्माराम गुप्ते | इं० | इं० | | एक लाहानसें ऐतिहासिक मासिक व कांहीं ग्रंथ मराठीः बाकी सव लिखाण इंग्रजी |
| २७ | बाळाजी प्रभाकर मोडक | इंग्रजी | इंग्रजी | | सर्व भाषान्तरें मराठी |
| २८ | वामन दाजी ओक | इंग्रजी | इंग्रजी मराठी | | सर्व लिखाण मराठी |
| २९ | विनायक कोंडदेव ओक | इंग्रजी | इंग्रजी मराठी | | सर्व लिखाण मराठी |
| ३० | बाळ गंगाधर टिळक, | इंग्रजी व स्वतंत्र | बहुतेक इंग्रजी, व थोडा मराठी | | बहुतेक ग्रंथ इंग्रजी एक ग्रंथ मराठी, बरींच व्याख्यानें इंग्रजी, बरींच व्या- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | | ख्यानें मराठी, बरेच वर्तमानपत्रीय लेख इंग्रजी, बरेच वर्तमानपत्रीय लेख मराठी |
| ३१ | महादेव शिवराम गोळे, | इंग्रजी | इंग्रजी | ग्रंथ मराठी |
| ३२ | वामन शिवराम आपटे, | इंग्रजी | इंग्रजी | इंग्रजी |
| ३३ | कान्होबा रणछोडदास कीर्तिकर, | इंग्रजी | इंग्रजी | गद्य ग्रंथ इंग्रजी; काव्यें मराठी |
| ३४ | गणेश व्यंकटेश जोशी, | इंग्रजी | इंग्रजी | सर्व निबंध इंग्रजी |
| ३५ | गोपाळ गणेश आगरकर, | इंग्रजी | इं० म० | सर्व लिखाण मराठी |
| ३६ | शंकर बाळकृष्ण दीक्षित, | मराठी | इंग्रजी व मराठी | इंग्रजी निबंध व एक मराठी ग्रंथ |
| ३७ | धोंडो केशव कर्वे, | इंग्रजी | इं० व म० | ग्रंथ मराठी |
| ३८ | गोपाळ कृष्ण गोखले | इंग्रजी | इंग्रजी | इंग्रजी |
| ३९ | रामचंद्र भिकाजी जोशी, | इंग्रजी | इं० म० | सर्व ग्रंथ मराठी |
| ४० | अण्णा किर्लोसकर | इंग्रजी व स्वतंत्र | इं० व म० | उत्कृष्ट मराठी पद्य |
| ४१ | काशीनाथ बापू पाटक, | इंग्रजी | इंग्रजी | सर्व निबंध इंग्रजी |
| ४२ | नाना भवानराव पावगी, | इंग्रजी | इंग्रजी व मराठी | कांहीं ग्रंथ इंग्रजी बहुतेक लिखाण मराठी |
| ४३ | व्यंकटेश बापूजी केतकर, | मराठी | इंग्रजी व मराठी | इंग्रजी, मराठी, संस्कृत ग्रंथ |
| ४४ | श्रीमंत बापूसाहेब कुरुंदवाडकर | मराठी | मराठी | मराठी |
| ४५ | श्रीमंत सयाजीराव गायकवाड, | इंग्रजी | इंग्रजी | स्वतःचे सर्व ग्रंथ इंग्रजी, उत्तेजित ग्रंथ इंग्रजी, गुजराथी, मराठी |
| ४६ | महादेव राजाराम बोडस, | स्वतंत्र | इंग्रजी | सर्व निबंध मराठी व क्वचित् इंग्रजी |

| | | | |
|---|---|---|---|
| ४७ चिंतामण विनायक वैद्य, | इंग्रजी उर्दू व स्वतंत्र | इंग्रजी मराठी उर्दू | इंग्रजी व मराठी ग्रंथ व निबंध |
| ४८ कृष्णाजी बल्लाळ देवल, | इंग्रजी व स्वतंत्र | इंग्रजी मराठी | सर्व नाटकें मराठी |
| ४९ चिंतामण गंगाधर भानू, | इंग्रजी | इंग्रजी मराठी | सर्व ग्रंथ, निबंध, व्याख्यानें व भाषान्तरें मराठी |
| ५० गणेश रघुनाथ अभ्यंकर, | इंग्रजी | इंग्रजी | निबंध मराठी |
| ५१ दामोदर गणेश पाध्ये, | इंग्रजी | इंग्रजी | सर्व निबंध मराठी |
| ५२ श्रीमंत बाळासाहेब मिरजकर, | मराठी | इंग्रजी मराठी | कीर्तनें, निबंध, ग्रंथ मराठी |
| ५३ श्रीमंत बाबासाहेब इचलकरंजीकर, | मराठी | इंग्रजी मराठी | ग्रंथ इंग्रजी |
| ५४ श्रीमंत बाळासाहेब औंधकर, | मराठी | इंग्रजी मराठी | चित्रग्रंथ इंग्रजी, मराठी कानडी, हिंदी; निबंध, व कीर्तनें व व्याख्यानें मराठी |
| ५५ पंडिता रमाबाई, | इंग्रजी | इंग्रजी मराठी | कांहीं ग्रंथ इंग्रजी, एक उत्कृष्ट ग्रंथ मराठी |
| ५६ रमाबाईसाहेब रानडे, | स्वतंत्र | इंग्रजी मराठी | एक ग्रंथ मराठी |
| ५७ श्रीमंत महाराणीसाहेब गायकवाड, | स्वतंत्र | इंग्रजी | ग्रंथ इंग्रजी |
| ५८ हरि नारायण आपटे, | इंग्रजी मराठी | इंग्रजी मराठी | एक खेरीज करून सर्व गोष्टी व कादंबरीग्रंथ मराठी |
| ५९ भाऊशास्त्री लेले, | मराठी | मराठी | सर्व भाषान्तरें मराठी |
| ६० विष्णु गोविंद विजापूरकर, | इंग्रजी | मराठी स्वतंत्र व इंग्रजी | बरेच निबंध मराठी कांहीं वर्तमानपत्रीय व शालेय लेख इंग्रजी |
| ६१ नीळकंठ बाबाजी रानडे, | इंग्रजी | इंग्रजी मराठी | इंग्रजीमराठी, कोश |
| ६२ वासुदेवशास्त्री खरे, | इंग्रजी | मराठी इंग्रजी | सर्व ग्रंथ व लिखाण मराठी |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ६३ | शिवराम महादेव परांजपे, | स्वतंत्र | इंग्रजीमराठी | शालेय टिप्पनी इंग्रजी बाकी सर्व निबंध ग्रंथ, व्याख्यानें मराठी |
| ६४ | कृष्णाजी प्रभाकर खाडीलकर, | स्वतंत्र | इंग्रजी मराठी | सर्व लिखाण मराठी |
| ६५ | श्रीपाद कृष्ण कोल्हटकर, | इंग्रजी | इंग्रजी मराठी | सर्व लिखाण मराठी |
| ६६ | नरसिंह चिंतामण केळकर | स्वतंत्र | इं. म. | कांहीं ग्रंथ इंग्रजी बरेच मराठी निबंध. |
| ६७ | वामन मल्हार जोशी | स्वतंत्र | इं. म. | सर्व लिखाण मराठी |
| ६८ | मोरो केशव दामले | इंग्रजी | म० इं० | सर्व लिखाण मराठी |
| ६९ | जनार्दन विनायक ओक | इं. व स्व. | म. क. इं. | सर्व लिखाण मराठी |
| ७० | कृष्णाजी विनायक वझे | इंग्रजी | म. इं. | कांहीं थोडें लिखाण इंग्रजी बाकी सर्व लिखाण मराठी |
| ७१ | गोविंद सखाराम सरदेसाई | संस्थानी | इं. म. | सर्व लिखाण मराठी अलीकडे एखादसदुरा लेख इंग्रजी |
| ७२ | विनायक लक्ष्मण भावे | स्वतंत्र | इं० म० | सर्व लिखाण मराठी |
| ७३ | विष्णुशास्त्री बापट | स्वतंत्र | मगठी | मराठी |
| ७४ | शंकर श्रीकृष्ण देव | इंग्रजी | म० इं० | सर्व लिखाण मराठी |
| ७५ | लक्ष्मण रामचंद्र पांगारकर | स्वतंत्र | इं० म० | सर्व लिखाण मराठी |
| ७६ | गोविंद काशीनाथ चांदोरकर | इं. | म० इं० | सर्व लिखाण मराठी |
| ७७ | भास्कर वामन भट | इंग्रजी | म० इं० | सर्व लिखाण मराठी |
| ७८ | श्रीधर व्यंकटेश केतकर | स्वतंत्र | म० इं० | कांहीं ग्रंथ इंग्रजी, निबंध व ज्ञानकोश मराठी |
| ७९ | श्रीपाद दामोदर सातवळेकर | स्वतंत्र | म. हिं. इं. | बरेच लिखाण हिंदी कांहीं निबंध, मासिक-पुस्तक मराठी |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ८० | वामन गोविंद काळे (अर्थशास्त्री) | इं० | इं० | इंग्रजी |
| ८१ | शंकर रामचंद्र राजवाडे | स्वतंत्र | मराठी | एक मराठी ग्रंथ |
| ८२ | यादव माधव काळे | इंग्रजी | इं०म० | मराठी ग्रंथ |
| ८३ | नारायण कृष्ण गद्रे | इंग्रजी | मराठी | मराठी |
| ८४ | वासुदेव दामोदर मुंडले | स्वतंत्र | मराठी | मराठी |
| ८५ | सीताराम केशव दामले | स्वतंत्र | इं०म० | सर्व ग्रंथ मराठी |
| ८६ | दत्तात्रय बळवंत पारसनीस | स्वतंत्र | इंग्रजी | कांहीं ग्रंथ चोपडी इंग्रजी, भारतवर्ष व इतिहाससंग्रह मराठी |
| ८८ | आबा चांदोरकर | स्वतंत्र | मराठी | मराठी |
| ८८ | दत्तो वामन पोतदार | इंग्रजी | म०इं० | सर्व लिखाण मराठ |
| ८९ | दत्तो विष्णु आपटे | स्वतंत्र | मराठी | मराठी |
| ९० | वासुदेव गोविंद आपटे | इंग्रजी | मराठी | बहुतेक सर्व लिखा |
| | | स्वतंत्र | इंग्रजी | मराठी |
| ९१ | श्रीपाद कृष्ण बेळवलकर | इंग्रजी | इंग्रजी | इंग्रजी, एखाद दुस निबंध व एक भाषान्तर मराठी |
| ९२ | रामचंद्र दत्तात्रेय रानडे | इंग्रजी | इंग्रजी | इंग्रजींत लिखाण |
| ९३ | पांडुरंग दामोदर गुणे | इंग्रजी | इंग्रजी | इंग्रजी, एखाद दुसर निबंध मराठी |
| ९४ | देवदत्त रामकृष्ण भांडारकर | इं. | इंग्रजी | इंग्रजी लेख व ग्रंथ |
| ९५ | कुटयांच्या खेरीज सर्व कवि, | बहुशः | मराठी | |
| | बहुशः कादंबरीकार व नाटककार | इं. | इं. म. | |
| ९६ | केशव सीताराम ठाकरे | स्वतंत्र | इंग्रजी | बहुतेक सर्व लिखाण |
| | | | मराठी | मराठी |
| ९७ | मऱ्हाठा वर्तमानपत्र | मराठी | इंग्रजी | इंग्रजी |
| ९८ | सर्व्हंट् ऑफ् इंडिया | इंग्रजी | इंग्रजी | इंग्रजी |
| ९९ | केसरी | पत्ते वगैरे | मराठी | मराठी लिखाण |
| | | इंग्रजी बाकी | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १५ | बाकी सर्व मराठी वर्तमानपत्रें | धंदा मराठी पत्ते इंग्रजी मराठी | इंग्रजी मराठी | मराठी |
| १६ | कालेजांतील नियतकालिकें | इंग्रजी | इंग्रजी | मुख्य भर इंग्रजी वर मराठी गौण |
| १७ | इंग्रजी शिकलेलीं आईबापें | इंग्रजी | इंग्रजींत स्वतःच्या मुलांशीं पत्रव्यवहार करतांना बरींच आढळतात. | |

यादींत फक्त अश्या च लोकां चीं नांवें गोंविलीं आहेत कीं ज्यांना जाणता हें विशेषण लावण्यास कोणी हि कचरणार नाहीं कित्येकांची तर गणना थोडी बहुत विद्वानांत हि होण्यासारखी आहे. अशा लोकांत मराठी भाषे च्या प्रचारा चा चढउतार कसकसा होत गेला, तें वरील यादी वरून अवगमितां येतें. इंग्रजी झाल्या वर पुण्या च्या पाठशाळे चा संसर्ग ज्या लोकांस प्रथम झाला त्या लोकां पैकीं गोडबोले, राजवाडे, वगैरे मंडळींनीं केवळ मराठींत रचना केली. कारण, त्यांच्या वेळीं पाठशाळेंत इंग्रजीचा प्रवेश झाला नव्हता. पाठशाळेंत इंग्रजी चा प्रवेश झाल्या वर जी मंडळी शाळेंतून निघाली त्यांतील कृष्णशास्त्री चिपळूणकर, तळेकर, वगैरेनीं यद्यपि ग्रंथरचना मराठींत केली, तथापि संवई नें व डौला नें खासगी पत्रव्यवहार ते इंग्रजींत करीत. इंग्रजींतून खासगी पत्रें लिहिण्यांत आपण कांहीं विपरीत कृत्य करीत आहोंत हा विचार त्यांना शिवला नाहीं. त्या च सुमारास मुंबईस दादोबा, कोल्हटकर, छत्रे वगैरे जी मंडळी शिकून बाहेर पडली त्यांचा खासगी पत्रव्यवहार इंग्रजींतून ष्यारीनें चाले. कारण मुंबईत इंग्रजी चा अंमल परभू, शेणवई, पारशी ह्यांच्यांत त्या कालीं सध्यांप्रमाणें च अतोनात असे. त्या शहरीं त्या कालीं इंग्रजी बोलणें, लिहिणें व बडबडणें मोठ्या प्रगती चें चिन्ह समजलें जाई. नंतर विश्वविद्यालय स्थापन झालें. त्यांतून भांडारकर, पंडित, तेलंग, रानडे, कुंटे, वगैरे जी पहिली मंडळी निघाली त्यांचा खासगी पत्रव्यवहार व ग्रंथलेखनव्यवसाय सारा च

इंग्रजींतून झाला. त्या कालीं ह्या लोकांत इंग्रजी इतकी बोकाळली कीं मराठीची ओळख इंग्रजी चष्म्यानें करण्याची संवय ह्या लोकांत ज्यारीनें फैलावली. कुंटयांनीं एक इंग्रजी मासिक पत्र काढलें. त्यांत दर वाक्यांत एखादी तरी इंग्रजी फ्रेज नसेल असें घडलें च नाहीं. क्रियापदा पुढील शब्दयोगी अव्यय, तर, कुंटयांचें एक हि चुकत नसे. रानडयांचे मराठी भाषे वरील इंग्रजी रिपोर्ट ह्या च धाटणीचे आणि भांडारकरांचीं मराठी भाषे वरील टिपणें ह्या च सुमारचीं. ह्या सर्व लोकांचा खासगी व लौकिक पत्रव्यवहार सारा इंग्रजींत. ह्यांच्या इंग्रजी पुढें छत्रे, चिपळूकर वगैरे जुने इंग्रजीशीक फिके पडले पुढें इंग्रजीशिकांची दुसरी पिढी आली. त्यांत विष्णुशास्त्री चिपळूणकर, जिन्सीवाले, शंकर मोरो रानडे ही मंडळी मोडतात. रानडे, भांडारकर ह्यांच्या प्रमाणें हे लोक इंग्रजींत ग्रंथ लिहीत नसत, परंतु पत्रव्यवहार विसराळूपणानें व संवईनें इंग्रजींत करीत. ह्यांच्या नंतर टिळक, वैद्य वगैरेंची तुकडी आली. हे लोक पत्रव्यवहार जरूर पडेल त्या प्रमाणें इंग्रजींत किंवा मराठींत करीत व ग्रंथ जरूर पडेल त्या प्रमाणें इंग्रजींत किंवा मराठींत रचीत. अलीकडे सध्यांच्या पिढींत तीन प्रकारचे लोक सांपडतात; ( १ ) पत्रव्यवहार व ग्रंथरचना दोन्हीं इंग्रजींत करणारे, ( २ ) पत्रव्यवहार इंग्रजींत व ग्रंथरचना मराठींत करणारे आणि ( ३ ) पत्रव्यवहार व ग्रंथरचना दोन्हीं मराठींत करणारे. पैकीं पत्रव्यवहार व ग्रंथरचना दोन्हीं मराठींत चालविणाऱ्यां चा वर्ग इतका लहान आहे कीं त्यांना हिशेबांतून वगळलें असतां मोठेंसें बिघडेल अश्यांतली बाब नाहीं. इंग्रजीं शिकलेल्यांचा बहुतेक सर्व पत्रव्यवहार इंग्रजींतून होतो, वाग्व्यवहार इंग्रजीमराठी मिश्र होतो आणि ग्रंथलेखव्यवहार बाहुल्यानें इंग्रजींतून व वैरल्यानें क्वचित् मराठींतून होतो. सध्यांचे कालेजांतील बहुतेक प्रोफेसर, शाळांतील बहुतेक मास्तर, व सरकारी व व्यापारी नोकरींतील बहुतेक सर्व कारकून इंग्रजीचा बाहुल्यानें उपयोग करतांना आढळतात. इंग्रजी शिकलेल्या स्त्रिया हि इंग्रजी शिकलेल्या पुरुषांचें साहजिकपणें अनुकरण करतात. तात्पर्य, इंग्रजी शिकलेल्यांची सहज तोंडांतून निघणारी व हातानें कागदावर सहज उमटणारी भाषा सध्यां इंग्रजी झाली आहे असें सामा-

न्य विधान केलें असतां तें फारसें चुकलें असें म्हणण्यास कोणी धजावेल असा संशय घेण्याचें कारण दिसत नाहीं.

८ सर्व सरकारी खातीं, सर्व भारतीय खासगी संस्था, सर्व बेपारी संस्था, इंग्रजी शिकलेले बहुतेक सर्व लोक आणि देशांतील बहुतेक सर्व जबाबदार ग्रंथकार देखील इंग्रजीचा उपयोग सररहा जेथें करूं लागलेले आढळतात तेथें असें विधान बिनतक्रार करतां येतें कीं, मराठी भाषेला गौणत्व देण्याकडे बहुतेक सर्व लोकांचा कल होत चालला आहे. ह्या कलाला दुसऱ्या एका विचित्र कारणानें पुष्टि मिळते. सर्व भरतखंडाचें व भरतखंडा शेजारील जे जे देश इंग्रज काबीज करतील त्यांचें एक राष्ट्र बनवणें अत्यंत इष्ट आहे अशी समजूत देशांत पांच–पन्नास वर्षें वावरत आहे. भारतवर्ष व त्याच्या शेजारील देश ह्यांत दोन अडीचशें प्रांतिक भाषा बोलल्या जातात. त्यांचें एक राष्ट्र बनवावयाचें म्हणजे व्यवहाराकरितां त्यांच्यांत सर्वसामान्य अशी कोणती तरी एक भाषा सुरू करणें अपरिहार्य आहे. होऊं घातलेल्या राष्ट्राची सामान्य व सर्वमान्य भाषा कोणती हि प्रांतिक भाषा होऊं शकत नाहीं. हिंदी सामान्य भाषा करावी असें इंग्रजीच्या द्वेषानें कोणी कोणी प्रतिपादतात. परंतु, ती भाषा इतर प्रांतिक भाषां प्रमाणेंच अडाणी व एकदेशी पडल्यामुळें तिचा स्वीकार कांग्रेसादि लोकसंस्था देखील करीत नाहींत; व्यवहाराला इंग्रजीचा च आश्रय करतात. तात्पर्य, राष्ट्रीय भाषा होण्याचा मान अपरिहार्यत्वें करून इंग्रजीला देण्याचा प्रघात राष्ट्रीय सभेनें हि पाडून अर्धे शतक होत आलेलें आहे. तेव्हां एकराष्ट्रीयत्वाच्या दृष्टीनें हि मराठी वगैरे प्रांतिक भाषांचा संकोच होत जाण्याचा निश्चित कल दिसतो.

९ इंग्रजीचें बंड अप्रतिबद्ध माजविण्याला आणीक एक कारण देतां येतें. तें हें कीं इंग्रजांनीं ज्या शास्त्रांच्या व कलांच्या एकमेव जोरावर ह्या खंडावर प्रभुत्व संपादन केलें तीं शास्त्रें व कला हस्तगत केल्यावांचून आपलें गेलेलें राज्य आपणास मिळवितां येणें अशक्य आहे अशी आतां शंभर वर्षांच्या अनुभवानें सार्वत्रिक खात्री होत चालली आहे. शास्त्रें व कला हस्तगत करावयाच्या म्हणजे युरोपीयन भाषांत असलेल्या शास्त्रांची व

कलांची परिभाषा आपण स्वीकारावयाची अशी ही एक समजूत रूढ झालेली दिसत आहे. ही परिभाषा पश्चिमे कडील इंग्लंड, फ्रान्स, जर्मनी आदिकरून सर्व राष्ट्रांनीं एका धर्तीवर बनविलेली असून तींतील मुख्य गाभ्याचे शब्द सर्व राष्ट्रांना सामान्य होऊन गेलेले आहेत. गाभ्याच्या शब्दांपासून विशेषणें बनवितांना प्रत्यय तेवढे निरनिराळ्या भाषांत निरनिराळे लागतात व सकरण किंवा अकरण रूपदर्शक आहे व नाहीं, हीं क्रियापदें तेवढीं भिन्न असतात. युरोपीयन शास्त्रें व कला ग्रहण करावयाच्या म्हणजे आपल्याला हि हे गाभ्याचे शब्द जसे चे तसे च स्वीकारण्यांत सौकर्य आहे. हे गाभ्याचे पारिभाषिक शब्द सुमारें चारशें शास्त्रांत व कलांत सुमार पांच पंचवीस लाखांहून हि जास्त असावेत असा अंदाज आहे. ह्या लक्षावधि पारिभाषिक शब्दांचे मराठी भाषान्तर करीत बसण्यांत मतलब नाहीं. एक तर हे पारिभाषिक शब्द कित्येक लक्षांनीं मोजावयाचे आहेत म्हणजे वेब्स्टर सारख्या इंग्रजी कोशांत जी शब्दसंख्या आहे तिच्या किती तरी पटींनीं मोजावयाचे आहेत. आणि दुसरें, यूरोपियन पारिभाषिक शब्दांना मराठी कृत्रिम संज्ञा यद्यपि दिल्या तत्रापि व्यवहारांत व बाजारांत त्या यूरोपांत कोणी ओळखीत नाहीं. समजा कीं आपल्याला हजार पांचशें रुपयांचा नत्र, उक्ष किंवा कर्ब यूरोपांतून विकत आणावयाचा आहे तर यूरोपियन दुकानदारांना ही आपली परिभाषा माहीत नसल्यामुळें ती पासून कांहीं च बोध होणार नाहीं, करतां त्यांच्या सोई करतां व विशेषतः आपल्या सोई करितां नत्र, उक्ष व कर्ब ह्यांचीं युरोपियन भाषान्तरें च योजावीं लागतील. एकंदर मथितार्थ असा कीं शास्त्रें व कला ह्यांची जी परिभाषा आतां सर्व पाश्चात्य जगांत सामान्य व सार्वत्रिक म्हणून ठरून गेली आहे ती च आपणांस स्वीकारणें सर्वतोपरी फायद्याचें आहे. ह्याचा अर्थ असा कीं शास्त्रें व कला ह्या जर आत्मसात् करावयाच्या असतील तर त्या कामीं मराठींतील आहे व नाहीं ह्या दोनचार किंवा दोनचारशें क्रियापदांखेरीज बाकी शब्दांचा विशेष उपयोग होण्यासारखा नाहीं. बाकीच्या सर्व जगाची जी सामान्य शास्त्रीय भाषा बनत आलेली आहे तिचा स्वीकार करण्याशिवाय गत्यंतर नाहीं. म्हणजे शास्त्रें व कला ह्यांच्या प्रांतांत,

दा. क्र.

इंग्रजांचें राज्य असो कीं नसो, इंग्रजी वगैरे युरोपियन् भाषांचा आश्रय आपणाला मुक्तहस्तानें केला पाहिजे. ह्या हि दृष्टीनें मराठीचा संकोच अतोनात होणार हें ठरल्यासारखें आहे. यूरोपियन शास्त्रीय परिभाषा ल्याटिन व ग्रीक शब्द घेऊन बनविलेली आहे. त्यांनीं इंग्रजी, फ्रेंच इत्यादि भाषांच्या घरांत जसा व जितपत प्रवेश केला तसा व तितपत प्रवेश त्यांचा मराठी भाषेच्या घरांत होणार ह्यांत संशय नाहीं. परंतु, हा गृहप्रवेश मराठी भाषा सुशिक्षित लोक बोलतील व लिहितील ह्या समजुतीवर व्हावयाचा आहे. सरकार, खासगी संस्था, व्यापारी व्यवहार व ग्रंथकार ह्यांनीं मराठी भाषेला जर सोडून दिलें तर यूरोपियन परिभाषे च्या प्रवेशाची गोष्ट च काढावयाला नको. मराठी भाषेला ह्या संस्थांनीं व लोकांनीं सोडून दिलें आहे च. तेव्हां युरोपियन परिभाषेच्या प्रवेशाचें भय आतां राहिलें नाहीं. जिवंताला भय, मृताला भयाचें हि भय नाहीं.

१० येणेंप्रमाणें मराठी भाषेचा संकोच आतां इतका अतोनात होऊन गेलेला आहे कीं ती यद्यपि अद्याप सपशेल मरून गेलेली नाहीं तत्रापि सध्यां ती फक्त धुगधुगी धरून आहे हें कबूल करणें भाग आहे. अशा स्थितींत आपल्या पुढें असा प्रश्न आहे, कीं मराठी भाषेच्या संबंधानें आपण आतां कोणतें धोरण ठेवावें ? ( १ ) मरत व संकोचत जात आहे तशी च तिला मरत व संकोचत जाऊं द्यावी व तिच्या ऐवजीं सररहा इंग्रजी भाषा घरीं दारीं प्रचलित होत आहे ती जास्त जोरानें आणीक प्रचलित करावी, किंवा ( २ ) तिची कड घेऊन व आपलें सर्व बळ खर्चून तिचें साहित्य करावें ? पहिला मार्ग, कळत म्हणा, न कळत म्हणा, आपण स्वीकारिलेला च आहे. तेव्हां ह्या मार्गांत आपल्याला कोणकोणत्या अडचणी येणार आहेत त्याचा आतां विचार करणें अवश्य दिसतें. स्वभाषेच्या सद्यःस्थितीचें, प्रगतीचें व प्रतिगतीचें प्रत्यवलोचन आपण कोणत्या हेतूनें करतां ? आपलें स्वत्व रहावें, आपलें राजकीय, वैय्यापारिक, धार्मिक, वाङ्मयिक बरें व्हावें, आपण पृथ्वीतला वर कोणी आहोंत अशी स्थिती आपणाला प्राप्त व्हावी, आपल्या सनातन संस्कृतीचा बोलबाला व्हावा, असा ह्या प्रत्यवलोच–

नाचा हेतू असणार व आहे, हें उघड आहे. त्या शिवाय आपण येथें जमलों च नसतों. तो हेतू स्वभाषा मरूं देऊन व इंग्रजी भाषा घरीं दारीं प्रचलित केली म्हणजे इंग्रजांचें स्वातंत्र्य,स्वाराज्य,व्यापार व शास्त्र-कला आपल्या होतात अशांतला बिलकुल प्रकार नाहीं. इंग्रजी जन्म-भाषा यद्यपि आपण केली, तत्रापि स्वातंत्र्य, स्वराज्य, व्यापार व शास्त्रकला हस्तगत करण्यास आपणा स्वतःला स्वार्थत्यागपूर्वक कष्टी मेहनत केली पाहिजे. कष्टी मेहनत न केली, तर स्वातंत्र्य, स्वराज्य व शास्त्रकला यांचें परिशीलन करणाऱ्या सर्वसमर्थ अशा इंग्रजांचे कारकून व हमाल सध्यां आहोंत त्या च प्रमाणें पुढें हि राहूं. फरक एवढा च होईल कीं सध्यां इंग्रजीमराठी अशी मिश्र भाषा आपण वापरतों ते निव्वळ इंग्रजी किंवा पिज्यन इंग्रजी वापरूं लागूं. तेव्हां इंग्रजी भाषे-च्या स्वीकारानें आपली प्रगती होईल, असा यत्किंचित् हि संभव दिसत नाहीं. स्वत्वांत जर स्वभाषेचा समावेश होत असेल तर इंग्रजी भाषा स्वीकारल्यानें मराठी भाषेला म्हणजे स्वत्वाला मात्र आपण मुकूं. तेव्हां इंग्रजी भाषेला जन्मभाषा करण्या पासून आपल्याला स्वत्वाच्या, स्वसंस्कृतीच्या किंवा स्वराज्याच्या दृष्टीनें कांहीं मदत होण्याचा फारसा संभव दिसत नाहीं. आतां बंगाली, पंजाबी, हिंदी, तामील, तेलगू, ब्रम्ही, वगैरे होष्यमाण राष्ट्रांतील लोकांशीं व्यवहार चालविण्यास इंग्रजी उपकारक होईल या आशेनें इंग्रजी भाषा जन्मभाषा करण्याच्या नादास सर्व आपण लागलों, तर तो नाद पुरा होण्याला व सफलतेस येण्याला एक मोठी अट आहे. ती अशी कीं इंग्रजांचें अधिराज्य अफगानि-स्ताना पासून चीनपर्यंत निदान चार पांचशें वर्षें तरी टिकेल अशी खात्री पाहिजे. कारण सगळ्या हिंदुस्थानची जन्मभाषा यच्चयावत् सर्व लोकांत इंग्रजी होण्यास कमींत कमी पांच चार शें वर्षांची अवधि, पाहिजे. आज पांसून पांच शें वर्षें इंग्रजी राज्य टिकेल काय ? इतिहासाची सल्ला घेतां असें दिसतें कीं गेल्या तीन हजार वर्षांत महाराष्ट्रांत जीं निरनिरा-ळीं राज्यें होऊन गेलीं त्यांची भरभराटीची व ऐन उमेदीची सरासरी हयात दोन अडीच शें वर्षां हून जास्ती नसते. शातवाहन, पूर्वचालुक्य, राष्ट्र-कूट, उत्तरचालुक्य, यादव, मुसुलमान, व मराठे ह्या सातांनीं एकंदर

अठरा शें वर्षें महाराष्ट्रा वर राज्य केलें, म्हणजे ह्यां पैकीं प्रत्येकाच्या वांटयास सरासरीनें अडीच शें वर्षें येतात. सदर प्रमाण जर प्रस्तुत रियासतीला लावलें, तर महाराष्ट्रा वर इंग्रजाची सत्ता आणीक दीड शें वर्षें राहील असें म्हणावें लागतें. महाराष्ट्रांतील सर्व लोकांची जन्म-भाषा इंग्रजी होण्यास निदान पांच शें वर्षांचा तरी अवधि अवश्यमेव पाहिजे असा अंदाज वर केलेला आहे. त्या अंदाजाला येतीं दीड शें वर्षें पुरत नाहींत. तेव्हां देशांत इंग्रजी भाषा जारीनें प्रचलित करण्याचा बूट जरा मागें च ठेवावा लागतो. आपण इंग्रजी भाषा बोलण्यांच्या ऐन रंगांत व उमेदींत यावें आणि इंग्रजी भाषेचे मूळ उगम जे इंग्रज त्यांनीं आपणाला निरुपायानें सोडून जावें, असें झाल्यास हातची मराठी तर गेली च, परंतु उसनी इंग्रजी हि निसटून जाईल. असे प्रकार घडलेले इतिहासांत नमूद आहेत जुन्या ब्रिटनांत रोमन लोकांच्या ल्याटिन् भाषेचा दाखला सर्वांना माहीत च आहे. सीलोनांत डच भाषेचा हि असाच फजिता उडाला. डच लोकांच्या राशियांतींत डच भाषेचा जों प्रसार होऊं लागतो, तों डच लोकांच्या हातून इंग्रजांनीं सीलोन हिसकावून घेतलें आणि डच भाषेच्या ऐवजीं इंग्रजी भाषा सुरू केली. तेव्हां तत्स्थ नेटिव्हांना डच सोडून इंग्रजीचा आश्रय करावा लागला. असले हाल टाळावयाचे असल्यास स्वभाषा जी मराठी तिची च कास बळकट धरून बसण्यांत स्वार्थ ऊर्फ शहाणपणा नाहीं काय? कोणी म्हणेल कीं, पोर्तुगीज, डच, फ्रेंच इत्यादि लोक जसे मागें पडले तसे इंग्रज पडणार नाहींत; कारण ह्या तीन हि लोकां हून इंग्रज जास्त हिकमती आहेत. तर त्या हि बोलण्यांत विशेष अर्थ नाहीं. लढाईंत जयश्री कोणाला वरील ह्याचा कांहीं नेम नसतो स्पेन्, पोर्तुगाल, हालंड्, फ्रान्स्, इंग्लंड्, जर्मनी, रशिया, इत्यादि राष्ट्रांचे चढउतार गेल्या पांच शें वर्षांत आपल्या दृष्टीस पडलेले आहेत. यूरोपांत ज्या राष्ट्रा चा चढ होईल त्या राष्ट्राच्या ताब्यांत पृथ्वी वरील हिंदू, मुसलमानी व चिनी देश जात आलेले आपण पाहिले आहेत. पर्वांच्या युद्धांत यूनाटेड् स्टेटस् न पडतीं व जर्मनीचा जय झाला असता तर इंग्लंड व फ्रान्स् यांच्या कॉलनी व डिपेंडंसी जर्मनीच्या ताब्यांत जात्या व हिंदुस्थानांतील आपणां गुलामां

वर इंग्रजी विसरून जर्मन भाषा शिकण्याचा प्रसंग ओढवला असता. वाटर्लूच्या लढाई नंतर पृथ्वीचें अग्रेसरत्व इंग्लंड च्या हातीं शंभर वर्षे गेलें तें गेल्या युद्धांत इंग्लंड च्या हातून निघून सध्यां यूनायटेड स्टेटस् च्या हातांत पडलें आहे. यूरोपांत जे बनाव बनतील त्यांच्या अधीन हिंदुस्थान ची भवितव्यता येत्या हजार वर्षांत होणार हें निश्चित दिसतें. इंग्लंड चा पराभव होऊन पृथ्वी वर फ्रान्स् अग्रेसर झालें, फ्रान्स्‌चा पराभव होऊन जर्मनी अग्रेसर झाला, जर्मनीचा पराभव होऊन यूनायटेड् स्टेटस् अग्रेसर झालीं, यूनायटेड् स्टेटस् चा पराभव होऊन जपान अग्रेसर झालें, तर फ्रान्स्, यूनायटेड् स्टेट्स् , जर्मनी, जपान इत्यादीं च्या मालकींत हिंदुस्थान जाईल व त्याला त्या त्या भाषा निरुपायानें बोलाव्या लागतील. असा हि तर्क केला असतां चालेल कीं इटली, जुगास्लोव्हिया, ग्रीस इत्यादि सध्यां क्षुद्र दिसणाऱ्या राष्ट्रांच्या हि ताब्यांत येत्या हजार बारा शें वर्षांत हिंदुस्थान केव्हां ना केव्हां तरी जाण्याचा संभव आहे. किंवा असा हि मोका बनून येईल कीं पृथ्वी वरील शास्त्रसमर्थ अशा दहा पंधरा राष्ट्रांत पृथ्वी वरील हिंदुस्थान, अफगानिस्तान, इराण, मेसोपोटोमिया, आशिया मायनार, इजिप्ट, मोरोक्को, वगैरे झाडून साऱ्या गुलाम देशांची सारखी वाटणी होऊन हिंदुस्थानांत निरनिराळ्या प्रांतांत इंग्रजी, फ्रेंच, जर्मन, ग्रीक, रशियन, जपानी, वगैरे भाषा एकसमयावच्छेदानें प्रचलित होतील. तात्पर्य, जो जो धनी भेटेल त्या त्या धन्याची भाषा महाराष्ट्राला येत्या हजार बारा शें वर्षांत वापरावी लागण्याचा बहुत संभव आहे अश्या सांभविक स्थितींत इंग्रजी वर भंरवसा ठेवून पांच चार शें वर्षांत महाराष्ट्राची भाषा इंग्रजी होईल व तिचा उपभोग आपणास पुढें बराच काल निर्धास्तपणें घेत रहातां येईल अशी आशा बाळगण्याची सोय नाहीं. अश्या सांशयिक व डळमळित स्थितींत---स्थितींत म्हणण्या पेक्षां—चलबिचलींत महाराष्ट्रानें कोणता मार्ग स्वीकारावा—( १ ) इंग्रजीचा आश्रय करावा, ( २ ) किंवा मराठीला चिकटून रहावें, ( ३ ) किंवा दैवा वरती हवाला ठेवून तुकोबाच्या म्हणी प्रमाणें स्वस्थ बसून जें जें होईल तें तें पहात रहावें—ह्या तिरपगड्या प्रश्नाचा उलगडा आपल्या सारख्या कवींच्या म्हणजे

कर्त्या व्यक्तींच्या विचाराचा विषय झाल्यास तदुपबृंहणार्थ कांहीं सूचना आपल्या पुढें मांडतां येण्या सारख्या आहेत.

११ इंग्रजीला एकान्तिक काट देण्याची तुमची ईर्ष्या नाहीं. इंग्रजींतून व्यवहार न करण्याची तुमची ताकद नाहीं. इंग्रजी पासून अलग रहाण्याची तुमची सोय नाहीं. तेव्हां तुह्माला एक च मार्ग शिल्लक रहातो. इंग्रजीच्या हल्ल्यानें मराठीचा जेवढा चुराडा होईल तेवढा निमूटपणें व संतभावानें होऊन द्यावयाचा एवढें च तुम्हांला शक्य आहे. त्या चुराडयांत शेंकडा शंभर इंग्रजी शब्द यद्यपि तुमच्या भाषेंत शिरले तथापि त्यां पैकीं बहुतेक सर्व शब्द अपभ्रष्ट होऊन गेल्या शिवाय तुम्हीं त्यांच्या वर आपलेपणाचा शिक्का मारणार नाहींत, ही एक समाधानाची बाब तुमच्या बाजूची दिसते. कदाचित् असें हि होण्याचा बहुत संभव आहे कीं इंग्रजी अपभ्रंश शेंकडयांनीं घेण्याचा दुर्धर प्रसंग च तुम्हां वर ओढवणार नाहीं. तुमच्या भाषेचा जसा क्षय होणार तसा च तुमच्यांतील शिष्ट जे ब्राह्मण त्यांचा क्षय होऊन, तुम्हीं तुमच्या धन्याचे केवळ गुलाम किंवा सनदी मजूर होऊन जाल व तुमचा शब्दकोश इतका रोडावून जाईल कीं तुमच्या धन्याच्या भाषेंतील लक्षावधि शब्दांतून पांच पन्नास खाण्यापिण्याच्या व मजुरीच्या धंद्याच्या शब्दां पलीकडे तुमचा शब्दकोश फोंफावणार नाहीं. तुम्हीं काय व्हाल व तुमची भाषा कशी होईल तें पहावयाचें असल्यास दूरच्या फिजींत किंवा केनियांत जा किंवा इतका लांबचा प्रवास तुम्हांला झेंपत नसल्यास जवळच्या गोव्यांत शिरा आणि तेथील किरिस्ताव चेडयांच्या मराठी भाषेची त्यांच्या पोर्तुगीज धन्याच्या भाषेखालीं कोण दुर्दशा उडून गेली आहे ती पहा. तीच दशा किंवा ती हूनहि निकृष्ट किंवा कृश दशा तुमच्या भाषेची तुमच्यावर येणाऱ्या फ्रेंच, जर्मन, इटालियन, ग्रीक व जपानी धन्याच्या भाषेच्या रेटयापुढें होऊन जाईल. कदाचित् असें हि होईल कीं पृथ्वीवरील शास्त्रसंपन्न राष्ट्रांची लोकसंख्या तुमच्या लोकसंख्येहून अनेक पटीनें वाढत आहे ती आणीक वाढून तुम्हाला गुलाम किंवा सनदी मजूर म्हणून देखील तुमच्या देशांत तुमचा धनी ठेवूं इच्छिणार नाहीं आणि तुम्हीं पृथ्वीच्या पाठीवरून नष्ट होऊन जाल. आणि

असें झाल्यास,—असें होण्याचीं स्पष्ट चिन्हें दिसत आहेत—सर्वच ग्रंथ आटपला. तुमच्या मराठी भाषेचें, मग, साहित्य करण्याचें प्रयोजन च रहात नाहीं.

१२ मराठी भाषेचें साहित्य करण्याला आपण जमला आहांत. परंतु ती भाषा अद्याप सपशेल मेली नसली तरी लवकरच जर मरून जाणार हें निश्चित आहे, तर तिचें साहित्य करण्याच्या खुळ्या नादास लागणें आपल्या सारख्या विचारवंतांना युक्त दिसत नाहीं. ही सल्ला न पटून मराठी भाषेचें साहित्य करण्याचा आपण आग्रहच धरला, तर तो आग्रह सफलतेस कसा नेतां येईल ह्या बाबीचा विचार गमतीखातर केला असतां घटकाभर करमणूक होण्याचा संभव नाहीं असें नाहीं. चालला आहे हा प्रकार जर असा च चालला तर मराठी लवकर च मरून जाणार म्हणून वर सांगितलें. तेव्हां सध्यां मराठी चें साहित्य करणें म्हणजे तिचा मृत्यू कशा नें टळेल तें पहाणें. एवढा च प्रश्न शिल्लक रहातो. व्याकरण, कोश, वृत्तरचना, शास्त्रीय परिभाषा हे मराठी भाषेच्या साहित्याचे सध्यां विषय च होऊं शकत नाहींत. आधीं ती जगेल कशी, ह्या बाबीकडे प्रथम व एकमेव अद्वितीय लक्ष पुरविलें पाहिजे. मराठीला जगवावयाची म्हणजे तिला मारण्याला प्रोत्साहक जीं कारणें झालीं तीं काढून टाकण्याचा एकनिष्ठ प्रयत्न करावयाचा. मराठी भाषा मारण्याला प्रोत्साहक जीं कारणें झालीं त्यांचीं याद अशी:—

( १ ) परकीय राज्यसत्तेचा सर्व व्यवहार इंग्रजींत चालतो

( २ ) स्वकीय राजकीयादि संस्थां चा सर्व व्यवहार इंग्रजींत चालतो

( ३ ) ग्रंथकार व इंग्रजीशीक धंदे, पत्रव्यवहार व ग्रंथलेखन इंग्रजींत करतात.

( ४ ) सर्व हिंदुस्थानचें व आशिया मायनरपासून चीनपर्यंतच्या लगतच्या देशांचें मिळून एक राष्ट्र बनविण्याच्या खुळ्या समजुतीच्या पोषणार्थ इंग्रजीचा स्वीकार

हे चार मराठी भाषेला मृत्युपंथास लावणारे जबरदस्त महारोग आहेत. हे महारोग काढून टाकिल्या शिवाय मराठी चीं प्रकृति सुधारावयाची नाहीं

व तिचा मृत्यू टळावयाचा नाहीं. परकीय धन्याच्या अमलाखालीं आलेल्या व येणाऱ्या इजिप्त पासून चीन पर्यंतच्या व काश्गर पासून बोर्नियो पर्यंतच्या सर्व टापूचें एकराष्ट्र बनविण्याची पोरकट कल्पना तुम्हीं जेव्हां आपल्या श्रद्धाळू डोक्यांतून झाडून टाकाल व केवळ महाराष्ट्राचें, कदाचित् त्यांतील एखाद्या सुटसुटीत अशा लहानग्या टापूचें, राष्ट्र बनविण्याची स्वल्प परंतु सुलभ महत्त्वाकांक्षा बाळगूं लागाल, तेव्हां पांचशें भाषांची एक भाषा करण्याच्या व्यर्थ व भ्रामक मोहांतून सुटून तुमचें एक च एक लक्ष्य स्वभाषा जी मराठी तिज कडे जाईल. पांचशें भाषा बोलणाऱ्यां चें एक राष्ट्र बनविण्याची कल्पना ज्या धूर्तानें तुमच्या डोक्यांत कोंबली त्याला ह्या हिंदुस्थानांत च म्हणून जय आला. यूरोपांत ही असली एक भाषेची कल्पना तत्रस्थ व्यवहारांत मुत्सद्यांनीं ती ऐकिल्या क्षणीं च फेटाळून लाविली असती. एक राष्ट्र बनविण्याची ही धूर्त कल्पना एकदा नाहींशीं झाली म्हणजे तुमच्या कांग्रेसेस व कान्फरन्सेस नामशेष होतील, हा फायदा होईल, परंतु आपली राजकीय उन्नती कुंठित झाली अशी विचित्र भीति तुमच्या हृदयांत उत्पन्न होईल. परंतु कांग्रेसादि सभां पासून तुमचें कांहीं राजकीय हित झालें आहे किंवा होणार आहे ही आशा च मूळांत अवास्तव आहे. भूमध्यसमुद्रा पासून पासिफिक-महासागरा पर्यंतच्या टापूचें किंवा बुखाऱ्या पासून सिंगापुरबोर्नियो पर्यंतच्या टापूचें किंवा अटक पासून कलकत्त्या पर्यंतच्या हि टापूचें कधीं-काळीं एक भाषा बोलणारें एक राष्ट्र होईल असा संशय सुद्धां मनांत आणण्याचें कारण दिसत नाहीं. एक राष्ट्रत्वाची कल्पना व ती अंमलांत आणण्याची खटपट करणाऱ्या कांग्रेसादि संस्था सोडून दिल्या म्हणजे मराठी भाषेला मृत्युपंथास लावणारे दोन महारोग तुमच्या पाठी-मागून सुटले. तिसरा महारोग म्हणजे पोटाचे धंदे, खासगी पत्रव्यवहार व ग्रंथ इंग्रजींतून साधण्याच्या कृत्रिम हव्यासाचा. ह्या महारोगाच्या कचाटींतून सुटावयाचें म्हणजे पोटाचे धंदे इंग्रजींतून करण्याची घाणेरडी चटक सोडून द्यावयाची. सध्यांच्या शाळा, कोर्टें, रेलवे इत्यादि संस्थांशीं संबंध सोडल्या बिगर ही दुष्ट व घातुक संवय सुटावयाची नाहीं. वाचक मिळावेत व जाणत्यांकडून वाहवा व्हावी ह्या आशेनें

तुमच्यांपैकीं कित्येक लोक इंग्रजींतून लिहितात. परंतु ही खुळी आशा सोडून देऊन मराठींत च लिहिण्याची प्रतिज्ञा तुम्ही केल्याशिवाय मराठी चा मृत्यु टळावयाचा नाहीं. मराठी भाषा जगवावयाची असेल तर सध्यांच्या शाळा, कोर्टें, रेल्वे ह्यांचें मुखावलोकन हि तुम्हीं करणार नाहीं मारावयाची असेल तर त्यांना कवटाळल्या वांचून रहाणार नाहीं. परंतु तुमच्या वर्तना वरून तर स्पष्ट दिसतें कीं सध्यांची शाळा कोर्टें वगैरे तुमच्या पैकीं कांहीं थोडया लोकांना सोडावया चीं आहेत व बऱ्या च लोकांना सोडावयाचीं असलीं तरी सुटत नाहींत. सध्यांच्या राशियतींत तुम्हीं इतके गुरफटून गेला आहांत कीं तीं तून बाहेर पडण्या चा मार्ग तुमचें पोट तुम्हांला सुचूं देत नाहीं. तुमचें पोट तर चाललें पाहिजे आणि भाषा तर जगली पाहिजे अश्या पेंचांत तुम्हीं आहां ह्याला एक च एक उपाय म्हणजे तुम्हाला स्वराज्य मिळविलें पाहिजे व शाळा, कोर्टें व रेल्वे ह्यांचा व्यवहार तुमच्या स्वभाषेंतून चालू केला पाहिजे. स्वराज्य मिळविण्याला दोन मार्ग आहेत; एक सशस्त्र प्रतिकाराचा म्हणजे शस्त्रांनीं लढण्याचा आणि दुसरा अशस्त्र प्रतिकाराचा म्हणजे असहकाराचा—दोन्ही मार्ग तुम्हाला मानवत नाहींत असें तुमच्या गेल्या शंभर वर्षांतलें वर्तन सांगतें. सशस्त्र प्रतिकार करण्या करितां युरोपीयन शास्त्रसिद्धि तुम्हीं बिलकूल केलेली नाहीं. अशस्त्र प्रतीकार पोटा चें भय तुम्हांला करूं देत नाहीं. बंगाल, मद्रास, दिल्ली, अयोध्या, पंजाब, गुजराथ, मळयालम, म्हैसूर, इत्यादींतील लोकां च्या सेवेनें व साह्यानें इंग्रजां नीं तुमचें मराठेशाहींतील स्वराज्य व साम्राज्य हरण केलें. सबब कांग्रेसादि राजकीय संस्था काढून हिंदुस्थानांतील सर्व प्रांतांत एकराष्ट्रीयत्वा ची भावना पसरविण्या चा रानडे वगैरे मुत्सद्यांनीं उद्योग केला. त्या उद्योगाला मुसलमान आड येऊं लागले. त्यांना तें म्हणतील ते लाड पुरवून जोडून घेण्या चा प्रयत्न टिळकादि मुत्सद्यांनीं केला आतां ब्राह्मणतर, अस्पृश्य इत्यादि तुमच्या विरुद्ध उठणाऱ्या लोकांना तुम्हीं अशीं च कांहीं आमिषें दाखवून जोडून घ्याल. नंतर तुमचा स्त्रीवर्ग तुमच्या विरुद्ध उठविला जाईल. त्यांची हि समजूत तुम्हांला पाडावी लागेल. पुढें आफ्रीडी, पठाण,

गोंड, खोंड, कातकरी, भिल्ल, इत्यादि आदिसमाज तुमच्या विरुद्ध उठविले जातील. त्यांचे सांत्वन तुम्हीं करीत बसाल. अशीं तुमचीं सुमोर पांचशें वर्षं सांत्वनांत जातील. नंतर तुम्हीं इंग्रजांशी दोन हात करण्याचा विचार कराल तों तुम्हांला असें आढळून येईल कीं, शास्त्र व शस्त्र ह्यांच्या अभावीं तुम्हीं केवळ लोळगोळे आहांत. म्हणजे सशस्त्र प्रतिकाराच्या कामीं तुम्हीं सध्यां जितके लोळेगोळे आहात तितकेच किंवा त्याहून हि जास्त लोळेगोळे पांचशें वर्षांनंतर असाल. अशस्त्र प्रतिकार तर मूळांत च तुमच्या पोटा आड येतो. नोकऱ्या सोडून पोट कसें भरेल याची तुम्हांला विवंचना पडते. परंतु तुमच्या नोकऱ्या मुसलमान, ब्राह्मणेतर, अस्पृश्य, आफ्रीडी, कातकरी, भिल्ल, खोंड, गोंड, नाग, इत्यादि लोक एकामागून एक हिसकावून घेण्यास पुढें ढकलले जातील; तेव्हां तुमच्या नोकऱ्या तर तुमच्या हात च्या जातील आणि पोटा चें भय मात्र तुमच्या हातांत शिल्लक राहील. मामलेदार, हेडक्लार्क, हेडमास्तर, इन्स्पेक्टर, मोठा ग्रॅजूएट च असावा लागतो असें नाहीं. कनिष्ठ शिक्षणाच्या मुसलमानां कडून, अस्पृश्यां कडून, गोंडां कडून किंवा ख्रिस्त्यां कडून तें काम करवून घेण्याची करामत व हिकमत तुमच्या धन्याच्या ठाईं अमूप आढळून आलेली आहे. पोटाच्या पाठीमागें लागलेल्या तुम्हांला असें अनेक शतकें झकवितां येईल. येणेंप्रमाणें सशस्त्र प्रतिकार किंवा अशस्त्र प्रतिकार ह्यांपैकीं कोणता हि प्रतिकार करण्यास तुम्हीं नालायक आहांत. तेव्हां उघड च झालें कीं, चालली आहे ही च स्थिति तुम्हांला पसंत आहे व मरत आहे त्याप्रमाणेंच तुम्हीं आपली स्वभाषा मरत जाऊं देणार आणि निरर्गल निर्लज्जता पदरीं येऊं नये म्हणून तिचें साहित्य करण्याचें पोकळ अवडंबर माजविणार.

१३ असें जर आहे, तुमची भाषा जर पोटा करितां व मिळणाऱ्या किंवा न मिळणाऱ्या माना करितां तुम्हीं मरत जाऊं देत आहां, तर तिचें साहित्य करण्या करितां संमेलनें भरविण्याच्या हास्यास्पद खटपटी तुम्हीं कोणत्या तोंडानें करतां ? तुम्हीं गेल्या पंचवीस तीस वर्षांत बरीं च संमेलनें भरविलीं. त्यां पासून मराठी भाषे चें साहित्य तुमच्या हातून कांहींएक झालेलें दिसलें नाहीं तुमच्या जवळ द्रव्य नाहीं, तुमच्या

जवळ नियम नाहीं, तुमच्या जवळ शस्त्र नाहीं, तुमच्या जवळ शास्त्र नाहीं, शास्त्र मिळविण्याला लागणारी तपश्चर्या करण्याची तुमची ताकद नाहीं, लढण्याचें सामर्थ्य व साहस नाहीं, रुसण्याचें कौशल्य नाहीं; तेव्हां तुम्हीं, तुमचें राष्ट्र, तुमचे लोक,तुमचा समाज,तुमचा धर्म, तुमचे देव व तुमची भाषा ह्यांनीं मृत्युपंथ धरिला ह्यांत विचित्र असें काय झालें ? मृत्युपंथास लागलेले जे तुम्हीं ते मृत्युपंथास लागून मढें बनत चाललेल्या तुमच्या भाषेचें साहित्य करण्या च्या गोष्टी बोलतां हें च विचित्र आहे. गुजराथी, बंगाली, हिंदी, वगैरे लोक गचाळ साहित्यसंमेलनें प्रेमानें भरावितात म्हणून अनुकरणानें तुम्हांला हि साहित्यसंमेलन भरवावयाची हुक्की येत्ये. तुमची मराठी भाषा जशी मरत व बुडत चालली आहे तश्या च, बंगाली, हिंदी वगैरे सर्व भाषा मरत व बुडत जात आहेत. मरतां मरतां चिपळोणकर, वगैरेसारखा एखाद दुसरा काजवा तुमच्यांत अधून मधून लिकलिकतांना आढळतो. परंतु एखाद्या पांखतुटक्या कोकिळाच्या आगमनानें किंवा काजव्याच्या लिकलिकण्यानें वसंतऋतु झाला असे जसें म्हणवत नाहीं, त्याप्रमाणें च एखाददुसरा थोडासा जातिवंत ग्रंथकार तुमच्यांत निघालासें वाटलें म्हणून तुम्हीं जिवंत आहांत असें म्हणण्याचें धाष्टर्य करवत नाहीं. पृथ्वी वरील शास्त्रसंपन्न राष्ट्रांचे त्याच्या सोईचें असल्यास, येत्या हजार दोन हजार वर्षें तुम्हीं गुलाम रहाणार हें तुम्हीं आपल्या वर्तनानें जगाच्या निदर्शनास स्पष्ट आणून दिलेलें आहे. गुलामांना स्वतंत्र विचार करणारी स्वतंत्र भाषा असलेली इतिहासांत कोठें नमूद नाहीं. करतां दुःखानें तुमच्या वतीनें असा निर्णय द्यावा लागतो कीं तुमच्या सध्यांच्या ह्या स्थितींत साहित्यसंमेलनें भरविण्याची दगदग तुम्हीं केली तरी मुमूर्षु मराठी चें मोठेंसें नुकसान होण्याचा संभव नाहीं.

१४ गेल्या वीस पंचवीस हजार वर्षांत शेकडों समाजां वर तुमच्या वर सध्यां जी भयंकर आपत्ति ओढवली आहे तशी आपत्ति ओढवून त्यांचें नाममात्र हि राहिलें नाहीं. नशीब तुमचें कीं, तुम्हीं अद्याप नामशेष झाला नाहीं—तुमच्या देशांतून तुमची अद्याप उचलबांगडी व्हावयाची आहे, अद्याप तुमची भाषा धुगधुगी धरून आहे, तिला पुनः सजीव करण्याची इच्छा अद्याप जर तुमच्यां पैकीं कोणांत निरतिशय वसत

क्र. ९०५५०

असेल व त्या करितां जर तुह्मां पैकीं कोणी संमीलित झाला असाल, तर तत्संबंधक उपाय शोधून काढण्या च्या कामास आतां तुम्हीं निरलसपणें लागावें अशी अध्यक्ष या नात्यानें विनंति आहे. भाषेंत नवीन वृत्तें आणावीं कीं नाहीं, भाषेंतून जुने यावनी शब्द निवडून फेंकून द्यावे कीं न द्यावे, नवीन इंग्रजी शब्द घालावे कीं न घालावे, वगैरे वस्तुतः क्षुल्लक परंतु आपाततः महत्वास चढलेले प्रश्न तुमच्या विचाराचे विषय, वेळ भरून काढण्या करितां, थोडे फार झाले असतां घटका भर मौज होईल. परंतु, जिची शुद्धि, संस्करण व अलंकरण तुम्हीं करूं चहाता त्या तुमच्या मराठी भाषेचा समीपासन्न मृत्यु कसा टळेल हें पहाणें तुमच्या समीलित विचाराचा एकमेव अद्वितीय विषय होणें सध्यां समीचीन दिसतें. कदाचित् विचाराल कीं, शक १७४० पासून शक १८४७पर्यंत या अवधींत ग्रंथ, निबंध, वर्तमानपत्रें, मासिक पुस्तकें व कविता मराठींत मंद च कां होईना परंतु उत्तरोत्तर वर्धमान श्रेणीनें वाढत आहेत, तेव्हां मराठी चा संकोच होत आहे व मराठी भाषा मरत आहे म्हणून कसें म्हणतां ? ह्या प्रश्नाला उत्तर असें आहे कीं शक १७४० या पूर्वीं स्वराज्यांत व साम्राज्यांत सर्व राजकीय, वैय्यापारिक व खासगी व्यवहारांत मराठी चा उपयोग इतक्या अबाढव्य प्रमाणा वर होत होता कीं त्या प्रमाणाशीं प्रस्तुत च्या शंभर वर्षांतील मराठी लिखाण तोलून पहातां तें त्याच्या पासंगास हि उतरेल कां नाहीं ह्या ची वानवा आहे.

ग्रंथ संग्रहालय
REFBK-0019152